**<u>राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदीची समितीची स्थापना</u>**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**क्र:-घरेलू-१२२४/प्र.क्र.२/काम-७ अ**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- ०८ जानेवारी, २०२४

**वाचा :-**

१) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागा, क्रमांक:भांखस-२०१४/प्र.क्र.८२/ भाग-III/उद्योग-४, दिनांक १/१२/२०१६.

**<u>शासन निर्णय:-</u>**

शासकीय कार्यालयांना आवश्यक असणाऱ्या वस्तूंची खरेदी करण्यासाठी, वर अनुक्रमांक १ येथे नमूद केलेल्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी सुधारित कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयासोबतच्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीचा नियम पुस्तिकेतील परिच्छेद २.९.२ नुसार मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखाली राज्यस्तरीय खरेदी प्रक्रीयेचा बाबतीत खरेदी प्रक्रीया निश्चित करण्यासाठी व लागणाऱ्या वस्तू / सामुग्री खरेदी संदर्भात राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समिती स्थापन करण्याबाबतची तरतूद नमूद करण्यात आलेली आहे.

०२. कामगार विभागाच्या अधिपत्याखाली विकास आयुक्त (असंघटित कामगार) यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने लागणा-या वस्तूंची खरेदी करणे तसेच याबाबतची निश्चिती करणे व खरेदी प्रक्रियेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्याच्या अनुषंगाने राज्यस्तरीय खरेदी समिती गठीत करण्यात येत असून त्या समितीमध्ये खालील नमूद अधिकाऱ्यांचा समावेश राहील.

**<u>राज्यसस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समिती</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | प्रशासकीय विभाग प्रमुख | अध्यक्ष |
| २) | संबंधित खरेदीदार विभाग (विकास आयुक्त (असंघटित कामगार) | सदस्य |
| ३) | संबंधित कार्यासनाचे उपसचिव/ सहसचिव | सदस्य |
| ४) | उद्योग सहसंचालक भांडार खरेदी किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५) | लेखा व कोषागार संचनालय गट " अ" दर्जाचा अधिकारी | सदस्य |
| ६) | संबंधित कार्यासनाचे कक्ष अधिकारी/ अवर सचिव | सदस्य सचिव |

उपरोक्त प्रमाणे खरेदी समितीकडून विभागासाठी लागणारी खरेदी प्रक्रीया निश्चित करण्यात येईल व खरेदी प्रक्रिया राबविण्यास प्रकरण परत्वे तपासून मान्यता देण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२४०१०८१५१२०५८५१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KARANSING PREMSING PATIL

Digitally signed by KARANSING PREMSING PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f2521c3a6d1f8429a3c2c9a42d575298ae82956908d63df441063695f377819, pseudonym=3A3CA4E4F15E12F04BF0F70BCA1F3C39DEE206CB, serialNumber=C7FEED7178D6C14666A5DF36811F1763590E65B6F836A87E63789DC234173D66, cn=KARANSING PREMSING PATIL
Date: 2024.01.08 15:12:44 +05'30'

**( क. प्रे. पाटील )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव (पत्राने),
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
५) विकास आयुक्त (असंघटित कामगार), प्रभादेवी, मुंबई-४०० ०१३.
६) कामगार आयुक्त, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पु), मुंबई- ५१.
७) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा व लेखा अनुज्ञेयता), मुंबई.
८) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा व लेखा अनुज्ञेयता), नागपूर.
९) सर्व कामगार उपायुक्त/सहायक कामगार आयुक्त.
१०) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
११) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व) मुंबई- ५१.
१२) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१३) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) निवडनस्ती (कामगार ७अ).